## किरकोळ फौजदारी अर्ज क्र.२९८/२०१८ मधील निशाणी क्र. १ खालील आदेश

१. अर्जदार दयाराम नाथाजी चौधरी यांनी प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे दाखल केलेल्या अर्जानुसार त्यांची जप्त केलेली तीन चाकी ॲपे रिक्षा क्र. एमएच १२ इएफ २५४३ ही परत मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्ज व त्यासोबत अर्जदाराने दिलेले प्रतिज्ञापत्र वाचले. तपासी अंमलदार यांनी त्या अर्जावर दिलेले म्हणणे वाचले. सर्व कागदपत्राचे अवलोकन केले.

२. अर्जदार यांचे थोडक्यात असे कथन आहे की, त्यांची तीन चाकी ॲपे रिक्षा क्र. एमएच १२ इएफ २५४३ ही गु.र.नं. २५२/२०१८ मध्ये मुंबई दारु बंदी अधिनियम ६५ ए इ मध्ये जप्त केली आहे. अर्जदार याचे असे कथन आहे की, सदरचे वाहन हे त्यांच्या रोजच्या वापरातील असून त्यांना त्याची आवश्यक आहे. तरी त्यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे सदरचे वाहन अटी व शर्तीवर परत मिळण्यास विनंती केली आहे.

३. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या जबाबात सदर वाहनाचा पुन्हा अवैध गावठी दारुच्या वाहतूकीसाठी करीता वापर केला जाण्याची शक्यता आहे करीता सदरचे वाहन हे अर्जदार यांना अटी व शर्तीवर परत करण्यास हरकत दाखविली आहे .

४. मा. सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई देसाई वि. गुजरात सरकार या प्रकरणात पोलीसांनी जप्त केलेले वाहने तसेच सोन्याचे दागिने त्याच्या मालकाला १५ दिवसाच्या आत परत करण्याबाबत निर्देश दिलेले आहे. तरी अन्य कोणत्याही व्यक्तीने त्याबाबत दावा दाखल केलेला नाही. परिणामी अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. सबब आदेश.

# आदेश

१. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना आदेशित करण्यात येते की, अर्जदार यांच्या मालकीची तीन चाकी अॅपे रिक्षा क्र. एमएच १२ इएफ २५४३ ही रु. ५०,०००/– च्या सुपुर्तनाम्यावर देण्यात यावी.

२. अर्जदार यांस सदर वाहन परत मिळाल्यानंतरः–

अ. न्यायालय सांगेल तेव्हा ते पुराव्याकामी हजर करावे.

ब. ते वाहन कोणाला विकू नये किंवा हस्तांतरीत करु नये किंवा त्याच्या बाहयरुपात कोणताही बदल करु नये.

३. निरिक्षक राज्य उत्पादन यांना आदेशीत करण्यात येते की, अर्जदार यांना नमुद वाहन देण्यापुर्वी त्याचे फोटो काढून त्याचा पंचनामा करण्यात यावा.

(एन. के. जोशी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खडकी, पुणे.

दि. ०७/०९/२०१८